**दिनांक १४/०७/२००९ रोजी मा.अतिरिक्त जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेचे इतिवृत्त.**

| अक्र/ विषय क्र. | विषय | विषय सादर करणारी संघटना कार्यालय | कार्य वाहीशी संबंधीत कार्यालय | कार्यवाही / निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे आणि सभेचा दिवस व वेळ निश्चिती बाबत .. | जि.उ.कें.अ.नगर | - | मागील सभेचे इतिवृत्त दि. ७-५-०९ व ३०-६--०९ सर्व संबंधीतांना देण्यात आलेले असून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच म.व्य. यांनी खुलासा केला की, शासना कडील सूचनेनुसार यापुढे माहे जुलै-०९ पासून जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक महिन्यातील दुस-या मंगळवारी सकाळी ११.० वाजता आयोजित करण्यात येणार असून त्यादिवशी सुटी आल्यास सुटीच्या आदल्या दिवशी सदर सभा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती सदस्य सचिवांनी सभागृहास दिली व त्यानुसार सर्व औद्यो. संघटना व सर्व संबंधीत शासकीय यंत्रणांनी नोंद घेऊन त्वरीत कार्यवाही करावी व सभेत झालेल्या चर्चा / निर्णया प्रमाणे केलेल्या अनुषंगीक कार्यवाहीचा अहवाल आठ दिवसात न चुकता जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी. तसेच संघटनांनी नविन मुद्दे पुढील सभेच्या आठ दिवस अगोदर जिल्हा उद्योग केंद्रास पाठविण्याची व्यवस्था करावी असे ठरले. **(कार्यवाही : सर्व औद्यो.संघटना व शासकीय कार्यालये)** |
| २ | मे.सनफार्माजवळ वाहने उभै असलेमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड अॅग्रीकल्चर अहमदनगर | महा नगर पालिका, अहम दनगर | मा. अध्यक्षांनी आदेश दिले की, पोलीस खात्याने वाहन उभि करण्यास ठराविक जागा नेमुन द्यावी व बेशिस्त वाहन उभि दिसल्यास कार्यवाही करावी. मऔविमं यांनी वाहतुकीस अडथळा निर्माण करणा-या अतिक्रमण धारक दुकानदारांनवर पुन्हा पुन्हा जप्तीची कार्यवाही करावी म्हणजे पुन्हा पुन्हा अतिक्रमण होणार नाही असे सर्वानुमते ठरले. ( **कार्यवाही - मऔविम)** |
| ३ | महा.नॉनबायोडिग्रेडिबल गार्बेज नियंत्रण अध्यादेश २००६ व क्ष्याअंतर्गत महा. प्लार्स्टी कपिशव्यांचे (कॅरीबॅग्ज) (उत्पादन व वापर) नियम २००६ व महा. अविघटनशिल धनकचरा नियम २००६ बाबत | जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर | मऔ विम | श्री. अजित धैसास यांनी या बाबतचा सविस्तर मुद्देसूद प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचे कडे सादर करण्याचे व त्यावर पुढील कार्यवाहीसाठी मऔविमं चे मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना प्रस्ताव सादर करण्याचे सर्वानुमते ठरले. ( **कार्यवाही मऔविम)** |
| ४ | श्रीरामपूर मऔविमं क्षेत्रासाठी मोठया प्रमाणावर कायम स्वरुपी | श्रीरामपूर एम आय | मऔ | मऔविमं चे अधिकारींनी खुलासा केला की, सदर योजनेंतर्गत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पाणी पुरवठयाची सोय होणे बाबत. | डी सी असोशिएशन | विमं | निविदा मागविण्यात आल्या आहेत. मा. अध्यक्षांनी सूचित केले की, सतत पाठपुरावा करुन काम वरीत काम पूर्ण करण्यात यावे. **(कार्यवाही मऔविम)** |
| ५ | अहमदनगर एमआयडीसी क्षेत्रांत पोलीस ऑउट पोस्ट बांधणेबाबत | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर, अहमदनगर | जिल्हा पोलिस अधिक्षक/ एमआयडीसी | चेअरमन, मराठा चेंबर यांनी ३ औट पोस्ट बांधुन देण्याचे मान्य केले असून एक एल ॲन्ड टी कडुन व दोन संघटने कडुन रहातील असे घोषित केले व पक्या स्वरुपाची पोलिस चौकीही त्वरीत बांधणे बाबत एल ॲन्ड टी कडुन कार्यवाही केली जाईल असे चेअरमन, मराठा चेंबर यांनी स्पष्ट केले. सदर विषय सूचिवरुन कमी करण्याचे सर्वानुमते ठरले. **(कार्यवाही : औद्योगिक संघटना)** |
| ६ | १. मऔविमं क्षेत्रासाठी अतिरिक्त जमीन संपादन | मराठा चेंबर | मऔविमं | मऔविम च्या अतिरिक्त क्षेत्राच्या भुसंपादनाबाबत मऔविमच्या अधिका-यांनी पाठपुरावा करुन प्रगती दर्शविणे दर्शविणे आवश्यक आहे व ज्या ठिकाणी मऔविमं यांनी जमीन प्रस्तावित केलेली आहे त्यापेक्षा पाथर्डी रोड लगत किंवा भाळवणी परिसरात मऔविमं मार्फत जमीनी बाबत निरीक्षण झाल्यास नजिकच्या काळात उद्योजकासाठी ते उपयुक्त होईल. **( कार्यवाही मऔविम)** |
| ७ | फुडपार्क मधील प्लॉट व प्रगती | मराठा चेंबर | मऔविमं | मंडळाचे अधिका-यांनी खुलासा केला की, ८६ प्लॉट वाटप झाले असून १४४ वाटपासाठी तयार आहेत. याबाबत मा. अध्यक्षांनी विचारणा केली की प्लॉट वाटपात पारदर्शकता असावी म्हणुन वाटप कोणत्या आधारे करण्यात येतात व त्याची पध्दत कशी आहे ती मंडळाने जाहीर करावी. आज मराविविमं चे अधिक्षक अभियंता बैठकीला आले नाहीत. ऑगष्ट-०९ च्या पहिल्या आठवडयात मऔविमं व मराविविकं यांच्या अधिक्षक अभियंता यांची संयुक्त बैठक घेऊन वीज पुरवठयाची अडचण दूर करण्यासाठी चर्चा करु. (कार्यवाही म औ वि मं) |
| ८ | मराविविकं यांनी मासिक बैठका लावणे बाबत | मराठा चेंबर | मराविविकं | महाराष्ट्राची विद्युत वितरण कंपनी यांनी तात्काळ कार्यवाही करुन दिनांक ३१/५/२००९ च्या आंत उद्योग संघटना व उद्योजकांची उद्योग उर्जा सभा आयोजित करावी असे ठरले होते. अद्याप त्यांनी अशी बैठक घेतली नसल्याची माहिती ऐकुन मा. अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली व त्वरीत जुलै ०९ महिन्यांत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | सभा आयोजित करुन अहवाल जिउकें स द्यावा असे ठरले. ( **कार्यवाही - मराविविकंलि)** |
| ९ | ३.१ भाळवणी येथील उद्योजकांना सुरळीत वीज पुरवठा होणे बाबत | अस्मिता, अ.नगर | मरावि विकं. | चर्चेअंती असे ठरले की यांत तांत्रिक बिघाड असल्यामुळे दिवसांतुन ४/५ वेळा थोडया वेळासाठी वीज पुरवठा खंडीत होतो. मा. अध्यक्षांनी सांगीतले की उद्योग उर्जामित्रची बैठक त्वरीत आयोजित करुन सदर विषयावर कार्यवाही करावी व प्रश्न सोडवण्यात यावा. **(कार्यवाही मराविविकंलि )** |
| १० | एमआयडीसीअंतर्गत लघु उदयोग घटकांना एल टी ग्राहका करीता दंड(पेनल्टी ) आकारण्याबाबत | अस्मिता अहमदनगर | म.रा वि वि कं | सदरचा विषय ऊर्जामित्रच्या सभेत घेवून निकाली काढावा असे ठरले होते. अद्याप अशी बैठक घेतली नसल्याचे सभागृहास कळाल्यावर मा. अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली व सांगीतले की उद्योग उर्जामित्रची बैठक त्वरीत आयोजित करुन सदर विषयावर कार्यवाही करावी.**(कार्यवाही म औ वि मं)** |
| ११ | क्लस्टरसाठी भूखंड मिळणे | मराठा चेंबरं | मऔविमं | एम एस ई सी डी पी अंतर्गत क्लस्टर विशेष हेतुवाहन (एस पी व्ही) चे प्रतिनिधी यांनी खुलासा केला की, दिल्ली येथे डायग्नोस्टीक स्टडी रिपोर्ट सादर करण्यात आलेला आहे. क्लस्टर अवेअरनेस वेब साईट तयार करण्यात आली आहे. भुखंड मिळाल्या नंतर ६ महिन्यांच्या आंत सामाईक सुविधा केंद्र उभारणीचे काम सुरु करण्यात येईल. तथापी क्लस्टर करीता २ ते ३ एकरचा भुखंड मिळणे आवश्यक आहे. त्या करीता जिल्हा उद्योग मित्रच्या माध्यमातुन पाठपुरावाही झालेला आहे. त्याबाबत पुन्हा पाठपुरावा आवश्यक आहे. **(कार्यवाही : मऔविमं, औद्यो. संघटना)** |
| १२ | कामगारांना वाहुन नेणा-या मिनी डोअर वाहनासाठी विनंती थांब्यांची जागा निश्चित होणे. | मराठा चेंबर | मनपा | मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षते खाली दि. ३०-६-०९ रोजी संपन्न झालेल्या झुम सभेत चेंबरच्या प्रतिनिधींनी अडचण मांडली की, कामगारांना वाहुन नेणा-या मिनी डोअर हल्ली कोणत्याही ठिकाणी थांबतात यामुळे रहदारीस नेहमी अडथळा होत असल्याने वाहनासाठी सावेडी बस स्थानका जवळ विनंती थांब्यांची जागा निश्चित केल्यास अपघात होणार नाहीत. मा.अध्यक्षांनी मनपाचे आयुक्तांशी पुढील सभेत चर्चा करण्याचे सांगीतले. **(कार्यवाही : मनपा )** |
| १३ | श्रीरामपूर मऔविमं क्षेत्रातील भूखंडा मध्ये मोठ मोठे खड्रडे करुन मुरुम चोरीला जात आहे. | श्रीरामपूर मऔविमं | मऔविमं | मंडळाचे अधिकारींनी खुलासा केला की आता एक पहारेकरी नेमला आहे. विषय सुचिवरुन कमी करण्याचे सर्वानुमते ठरले |
| | ज्रविन विषय | | | |
| १ | उद्योग सेतु प्रस्तावा बाबत | जिल्हा उद्योग केंद्र | - | उद्योजकांना उद्योगाशी निगडीत विविध शासकीय कायदे नियम व |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | योजनांची माहिती उपलब्ध करुन देणे, सेवेचा दर्जा वाढवणे, उद्योग उभारणीसाठी विविध शासकीय व निमशासकीय संस्थांकडून लागणारे विविध परवाने/ निपटारा प्रमाणपत्रे/नाहरकत प्रमाणपणे/विविध सेवा इ. बाबत मार्गदर्शन करणे व एकाच ठिकाणी या सेवा कालमर्यादेत उपलब्ध करुन देणे हया उद्दिष्टाची पर्तता करण्यासाठी उद्योग सेतु जिल्हा उद्योग केंद्रात सुरु करणे प्रस्तावित आहे. त्या बाबतचा प्राथमिक प्रस्ताव उद्योग संचालनालयास सादर करण्यात आला आहे. त्याकरीता लागणारे हार्डवेअर व सॉफटवेअर उपलब्ध करुन देण्याची तयारी अस्मिता संघटनेने दर्शविली आहे अशी माहिती महाव्यवस्थापक यांनी दिली. |

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार प्रकट करुन व मा. अध्यक्षांच्या अनुमतीन सभा संपल्याचे सदस्य सचिव यांनी जाहीर केले.

**स्वाक्षरी/----------------**
महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव
जिल्हा उदयोग केंद्र, अहमदनगर

**स्वाक्षरी/----------------**
अतिरीक्त जिल्हाधिकारी, अहमदनगर